■ वर्ष- ११ ■ अंक- ८ ■ मुंबई, मंगळवार, ०७ जानेवारी ते १३ जानेवारी २०२५ ■ पृष्ठ-४
ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
मूल्य २/- रुपये
POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

# पोलीस बातमी पत्र
# POLICE BATMI PATRA

पोलीस बातमी पत्र
●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2
शरीरावर जाड केस येणे होईल नाहीसे

3 → शहरांचा श्वास कोंडतोय
थकबाकी असलेल्या अडीच हजार नळ जोडण्या महापालिकेकडून खंडित ← 4

www.policebatmipatra.in policebatmi police batmi patra policebatmipatra policebatmipatra@gmail.com

## आश्रय सामाजिक,सांस्कृतिक,शैक्षणिक ट्रस्ट मार्फत नाशिक येथे थॅलेसिमिया मुक्त महाराष्ट्र कार्य शाळा संपन्न





**सिन्नर,**थॅलेसेमिया मुक्त महाराष्ट्र या अभियानात आज दिनांक 2 जानेवारी 2025 रोजी धन्वंतरी मेडिकल कॉलेज कामटवाडे नाशिक यात जनकल्याण ब्लड बँक एके डायग्नोस्टिक नाशिक व आश्रय ट्रस्ट ठाणे प्रोफेसर डॉक्टर प्रकाश पांगंम विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले , थॅलेसिमिया, अँनिमिया कसा ओळखायचा .. विवाह जुळवताना या तपासणीचे महत्त्व सांगितले, रक्त दात्यवर व रक्तपेढी पडणारा बोझा हे लक्ष्यात घेता .. विद्यार्थ्यांना आव्हान केले यात 90 ,विद्यार्थ्यांनी त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला त्याबद्दल धन्वंतरी मेडिकल कॉलेज कडून प्रोफेसर भाटकर मोलाचे सहकार्य केले सर्व विद्यार्थ्यांनी आनंदाने जाऊन घेतले.




## थॅलेसेमिया मुक्त महाराष्ट्र अभियानाला सुरुवात



**सिन्नर,**

थॅलेसेमिया मुक्त महाराष्ट्र हे ब्रीद घेवून गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सिन्नर आणि आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्ट ठाणे यांचे संयुक्त विद्यमाने मेडिकल लॅबोरेटरी टेक्निशियन व व्यावसायिक यांची एक दिवसीय राज्यस्तरीय परिषद रविवार दिनांक 19 जानेवारी 2025 रोजी रावसाहेब थोरात हॉल गंगापूर रोड नाशिक येथे संपन्न होणार आहे. यानिमित्त मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालयात संस्थेचे सरचिटणीस अ‍ॅड. नितीन ठाकरे, आश्रय ट्रस्टचे विश्वस्त डॉ दीपक नाईक, सिन्नर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. व्ही. रसाळ यांची बैठक संपन्न झाली. या बैठकीत सदर परिषदचे यशस्वी आयोजन होण्यासाठी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. याप्रसंगी संस्थेचे सरचिटणीस अ‍ॅड. नितीन ठाकरे म्हणाले की संस्थेच्या विविध महाविद्यालयातील विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांचे रजिस्ट्रेशन जास्तीत जास्त होण्यासाठी संस्था प्रयत्न करेन. या परिषदेच्या निमित्ताने महाराष्ट्रभर थॅलेसेमिया या अनुवंशिक आजाराबद्दल चर्चा होऊन जनजागृती होईल. तसेच संपूर्ण महाराष्ट्र थॅलेसेमिया मुक्त करण्यासाठी विविध महाविद्यालयातील शेवटच्या वगार्तील विद्यार्थ्यांची थॅलेसेमिया चाचणी करण्यात येईल. परिषदेच्या प्रमुख अतिथी व नियोजन कसे करायचे याबद्दल चर्चा झाली. आश्रय ट्रस्टचे विश्वस्त डॉ. दीपक नाईक यांनी सदर अभियानास ट्रस्टच्या वतीने संपूर्ण सहकार्य केले जाईल असे घोषित केले. परिषदेच्या दिवशी थॅलेसेमे जनजागृती व सीबीसी तपासातील बारकावे या विषयावरील मराठी भाषेतील सर्व टेक्निशियनस व विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त असे प्रोफे. प्रकाश पांगम यांचे पन्नास वषार्चे अनुभवांवर आधारित लेखक प्रा. संजय पवार यांच्या सिद्ध हस्त लेखणीने लिखित पुस्तक प्रकाशित होणार आहे. या बैठकीस प्रोफे. प्रकाश पांगम आरोग्य सचिव आश्रय, डॉ. नितीन जाधव शिक्षणाधिकारी, सौ. प्रीती नाईक सचिव आश्रय, श्री. गुरुप्रसाद नाईक आश्रय पदाधिकारी, प्रा. दीपक भिसे, सौ. भिसे उपस्थित होते. बैठकीसाठी म. वि. प्र. संस्थेने हॉल उपलब्ध करून दिला. याबद्दल संस्थेचे आभार. सदर परिषदेची मीटिंग संपन्न होण्यासाठी प्रा. संजय पवार परिषद सचिव यांनी परिश्रम घेतले.







## कुणब्याची गाथा या पुस्तकास राज्यस्तरीय आदर्श साहित्यरत्न पुरस्कार

कुणब्याची गाथा या पुस्तकास राज्यस्तरीय आदर्श साहित्यरत्न पुरस्कार जाहीर. प्रा. संजय पवार लिखित 'कुणब्याची गाथा'या आत्मचरित्रात्मक ग्रंथास तेजस फाउंडेशन नाशिक यांच्यावतीने पुरस्कार जाहीर झाला. सदर पुरस्कार 23 जानेवारी 2025 रोजी डॉ. मौलाना आझाद संशोधन केंद्र, संभाजीनगर येथे प्रदान करण्यात येणार आहे. यानिमित्त मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस अ‍ॅड. नितीन ठाकरे यांनी पवार सरांचे अभिनंदन केले. तसेच सिन्नर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. व्ही. रसाळ, संस्थेचे शिक्षणाधिकारी डॉ. नितीन जाधव, आश्रय ट्रस्टचे विश्वस्त डॉ. दीपक नाईक, सौ. नाईक, प्रोफे. प्रकाश पांगम आश्रय संस्थेचे आरोग्य सचिव, श्री. गुरुप्रसाद नाईक, प्रा. संदीप भिसे, सौ. भिसे यांनी अभिनंदन केले. तसेच म . वि. प्र. संस्थेचे पदाधिकारी आणि मा. कृष्णाजी भगत संचालक सिन्नर तालुका यांनी देखील अभिनंदन केले.

सिन्नर येथील प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, साहित्यिक आणि नागरिकांनीही त्यांचे अभिनंदन केले.





## ओपनफेस सँडविच

**तेच** तेच पदार्थ खाऊन कंटाळा येतो. खास करून मुलांच्या डब्यात काय पदार्थ द्यावे हे सुचत नाही. पोळीभाजी नको, पराठे खाऊन कंटाळा आला, सँडविच काय तेच तेच.. मग असे करायचे की हे पदार्थ वेगळ्या रूपात द्यायचे. आता सँडविच. नेहमीचे कसे असते, बटाटा, चटणी, काकडीबरोबर नाही का! मग सँडविचला वेगळे रूप द्यायचे. नेहमीचे सँडविच बंद असते, हे ओपनफेस ठेवायचे.



**साहित्य** – उकडलेला बटाटा, सिमला मिरची, गाजर, फरसबी, चाट मसाला, चिली फ्लेक्स, जिरे पूड, लसूण, मीठ, लिंबू, ब्रेड, चिझ किंवा बटर.

**कृती** – उकडलेला बटाटा किसून त्यात हवी तर सिमला मिरची, गाजर, फरसबी काहीही घाला. मात्र अत्यंत बारीक चिरून. आता यात हवा तो मसाला टाका. चाट मसाला, ड्राय हॅर्ब्स, चिली फ्लेक्स, जिरे पूड, लसूण, मीठ, लिंबू रस चांगले एकत्र केले की ब्रेडचे लांबट तुकडे करा. त्यावर हे मिश्रण थापा. वरून चीझ किसून घाला अथवा थोडे बटर घाला. साधारण ग्रील करा किंवा तव्यावर शेकवून द्या. हे सँडविच मेयो किंवा चटणीसोबत खायला द्या.

### वॅक्सिंगऐवजी शेव्हिंगचा पर्याय वापरत असाल तर या गोष्टी ठेवा लक्षात

## शरीरावर जाड केस येणे होईल नाहीसे



**आता लवकरच उन्हाळा सीझन सुरू होईल, समर वाइब्सनुसार आपणही शॉर्ट्स, क्युट ड्रेसेस घालून बाहेर पडण्याच्या विचारात असाल, अशावेळी पायावर जाड केस असले तर असे कपडे कसे घालू? असा प्रश्नही तुम्हाला साहजिक पडेलच. मग अगदी आयत्या वेळी पार्लरमध्ये जाण्याऐवजी आपण घरीच रेझर घेऊन शेव्हिंगचा पर्याय निवडाल, वास्तविक यात काही हरकत नाही, मात्र अनेकदा शेव्हिंगमुळे पुन्हा अंगावर येणारे केस हे नियमित लवेपेक्षा जाडसर येतात आणि पुढच्या वेळी हेच केस पुन्हा काढून टाकताना त्वचेला त्रास होतो. असं होऊ द्यायचं नसल्यास तुम्हाला शेव्हिंगवेळी फक्त काही सोप्या टिप्स लक्षात ठेवण्याची गरज आहे. अनेक महिलांना वॅक्सिंगमुळे त्रास होतो, तर हेअर रिमूव्हल क्रीम्समुळे त्वचा काळवंडते, असाही काहींचा अनुभव असतो, यावर पर्याय म्हणून रेझरचा वापर हा त्यातल्या त्यात सेफ म्हणता येईल. फक्त रेझर योग्य पद्धतीने वापरला जातोय का, याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. ही योग्य पद्धत कोणती आणि शेव्हिंग करताना कोणत्या गोष्टी लक्षात ठेवावयाच्या, हे जाणून घ्या..**

**कसा वापराल रेझर?**

रेझर फिरवताना ज्या दिशेने केस येतात त्या दिशेनेच फिरवा, यामुळे केस मुळासकट निघून जायला मदत होते आणि पुढील वेळेस जाड केस येत नाहीत. रेझर फिरवताना दुखापत होईल इतका जोर लावू नका. हात, पाय, अंडरआर्म्स, गुप्तांग अशा सर्वच ठिकाणी एकच रेझर वापरू नका. ब्लेड चेंज करणारे रेझर वापरत असाल तर एखादे ब्लेड तीन ते जास्तीत जास्त चार वेळा वापरा. त्यावर नको. शेव्हिंग प्रोसेस सोपी करतील असे मार्ग -

˘ जो भाग शेव्ह करायचा आहे तो पाण्याने भिजवा यामुळे केस नरम होतील. ˘ हात किंवा पाय, अंडरआर्म्स, प्रायव्हेट पार्टवरील केस काढायचे असतील तरी आधी त्यावर कमी केमिकल्स असलेले शेव्हिंग फोम वापरा, मगच केसांवर रेझरचा वापर करा. यामुळे केस नरम होतात आणि पटकन निघून जातात. ˘ शेव्हिंग केल्यानंतर तुमच्या त्वचेची छिद्रे उघडतात. त्यात धूळ जाऊ नये किंवा कोरडेपणा येऊ नये, रेडनेसचा त्रास होऊ नये म्हणून चांगले मॉइश्चरायझर त्वचेला लावा. ˘ शेव्ह केल्यानंतर आधी तुम्ही तुमच्या अंडरआर्म्सला ॲलोवेरा जेल किंवा बर्फ लावा. बेबी पावडरने जळजळ होत असल्यास लगेच थांबते.



### मिठाई बनवताना साखरेऐवजी

## वापरा खजुराची पेस्ट

आपल्या दैनंदिन आहारामध्ये साखरेचा वापर होत असतो. चहा, कॉफी, आणि मुख्य म्हणजे आपल्या आहारातील बहुतेक सर्वच गोड पदार्थांमध्ये साखरेचा वापर नियमित केला जात असतो. केवळ घरी तयार करण्यात आलेल्या पदार्थांतच नव्हे, तर ब्रेड, बिस्किटे, तयार सॉसेस, सँडविच स्प्रेड्स, पॅकेज्ड फळांचे रस, कोल्ड ड्रिंक्स यांमध्येही साखरेचे प्रमाण जास्त असते. रिफाईन्ड साखर अतिप्रमाणात खाल्ल्याने आरोग्याला धोका निर्माण होत असून, तरुण वयातच उच्च रक्तदाब, मधुमेह, इत्यादी विकार उद्भवण्याचे प्रमाण वाढले आहे.



**आहारामध्ये** साखर जास्त असल्याने चेहऱ्यावर अकाली सुरकुत्या येणे, वारंवार मुरुमे, पुटकुळ्या येणे, इत्यादी लक्षणे दिसू लागतात. त्यामुळेच आहारतज्ज्ञ दैनंदिन आहारामधून साखरेचे प्रमाण कमी करून साखरेऐवजी नैसर्गिक स्वीटनर्स वापरण्याचा सल्ला देत असतात.

नैसर्गिक स्वीटनर्समध्ये अनेक पर्याय उपलब्ध असून त्यामध्ये खजुराच्या पेस्टचा समावेश करता येऊ शकतो.

खजुराची विशेषता अशी की त्यामध्ये नैसर्गिक शुगर्ससोबत प्रथिने, फायबर, झिंक, मॅग्नेशियम इत्यादी क्षारही आहेत. शंभर ग्रॅम खजुरामध्ये २८२ किलो कॅलरीज इतकी ऊर्जा असते. त्यामुळे खजुरापासून तयार केली गेलेली पेस्ट किंवा सिरप रिफाईन्ड साखरेऐवजी वापरली जाऊ शकते. खजुराची पेस्ट घरच्या घरी तयार करण्यासाठी केवळ खजूर आणि स्वच्छ पाणी, इतक्याच साहित्याची आवश्यकता आहे. खजुराची पेस्ट बनवण्यासाठी ताजा पिकलेला खजूर पाण्यामध्ये भिजवून ठेवावा. खजूर भिजवण्याआधी त्याच्यातील बिया काढून टाकाव्यात. त्यानंतर गरम पाण्यामध्ये खजूर भिजवावा. हा खजूर रात्रभर पाण्यामध्ये भिजू द्यायचा आहे.

दुसऱ्या दिवशी सकाळी खजूर पाण्यातून काढून घेऊन मिक्सरवर बारीक वाटावा. खजूर भिजवून ठेवलेले पाणी टाकून न देता हे पाणी खजूर मिक्सरवर वाटत असताना घालावे. आवश्यक तितके पाणी घालून आपल्याला हवी तितकी घट्ट किंवा पातळ पेस्ट तयार करून घ्यावी.

या पेस्टमध्ये किंचित मीठ, आवडत असल्यास मध, किंवा दालचिनीची पूड मिसळता येईल. यामुळे या पेस्टला वेगळीच चव येते. खजुराचे सिरप तयार करण्यासाठी खजूर पाण्यामध्ये उकळून घ्यावेत.

त्यानंतर खजूर उकळलेले पाणी गाळून घेऊन खजुराचा गर वेगळा करावा. गाळलेले पाणी पुन्हा उकळत ठेवून पाकाप्रमाणे दिसेपर्यंत आटवावे. तयार झालेले सिरप थंड झाल्यावर बाटलीमध्ये भरून ठेवावे. खजुराच्या सिरपपेक्षा खजुराची पेस्ट अधिक चांगली, कारण या पेस्टमध्ये फायबर असते.

**मनुके खाण्यास जेवढे स्वादिष्ट आहेत, तेवढेच अन्य ड्रायफ्रुटच्या तुलनेत स्वस्त देखील आहेत. मनुक्यांचा वापर अनेकदा गोड पदार्थांमध्ये केला जातो. याचा स्वाद पदार्थाला चवदार बनवतो. याव्यतिरिक्त मनुके खाण्याचे अनेक फायदे आहेत. हे फायदे जाणून घेऊया...**

## जाणून घ्या फायदे मनुके खाण्याचे



**शरीराला ताकद मिळते –** दररोज मनुके खाल्ल्याने शरीराला ताकद मिळते. मनुक्यात नैसर्गिक साखर असते, जी सहज पचते. यामुळे शरीराला त्वरित ऊर्जा मिळते. मनुक्यात कोलेस्ट्रॉल नसते, ज्यामुळे हृदयाची समस्या असलेल्या रुग्णांसाठी हे चांगले आहे.

**बद्धकोष्ठता असणाऱ्यांसाठी फायदेशीर –** जर तुम्हाला बद्धकोष्ठता असेल तर मनुके खूपच फायदेशीर आहेत. बद्धकोष्ठतेची समस्या दूर करण्यासाठी मनुके एकप्रकारचे वरदान आहे. मनुक्यांना भिजवून खाल्ल्याने अधिक फायदा होतो.

**वजन कमी करण्यासाठी –** मनुक्यातील नैसर्गिक साखर तुमच्या शरीराला नुकसान पोहचवत नाही. यामुळे याचे नियमित सेवन केल्याने तुमचे वजन देखील कमी होते.

**हाडे मजबूत होतात –** हाडे मजबूत करायची असतील तर मनुक्यांचे सेवन नक्की करा. मनुक्यात कॅलिशियमचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे याचे सेवन दररोज करावे.

## फोन चोरी झाल्यास अशा प्रकारे करा बँक डिटेल्स आणि मोबाईल वॉलेटचे रक्षण

**तुमचा फोन चोरीला गेल्यास सर्वप्रथम तुमचं सिम कार्ड ब्लॉक करा. तसेच मोबाईल बँकिंग, यूपीआय पेमेंट आणि मोबाईल वॉलेट ब्लॉक करा. फोन चोरी झाल्याची तक्रार नजीकच्या पोलीस स्टेशनमध्ये करायला विसरू नका.**

**हल्ली** चोर तुमचा फोन मिळाल्यावर फक्त एकच गोष्ट शोधतात ते म्हणजे तुमचे बँक डिटेल्स. सध्या डिजिटल पेमेंट होत असल्यामुळे एकाच डिव्हाइसमध्ये वेगवेगळ्या ॲप्सचा समावेश असतो. स्मार्टफोन चोरण्यासाठी या डिजिटल वॉलेटपर्यंत पोहोचणं इतकं कठीण नाही. अशा अनेक वाईट घटना देखील घडल्या जिथे फोन चोरीला गेल्यावर बँक डिटेल्स मिळवून चोराने बँक अकाऊंट रिकामं केलं.

अशा प्रकारच्या धोक्यापासून वाचण्यासाठी काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत आणि फोन चोरीला गेल्यावर त्या केल्या पाहिजेत. जर तुमचा फोन हरवला किंवा चोरीला गेला तर तुम्ही पुढील पद्धती अवलंबून तुमच्या फोन किंवा त्यातील डेटाचा गैरवापर टाळू शकता.

**सिम कार्ड ब्लॉक करा**

फोन हरवल्यावर फोन नंबरचा गैरवापर टाळणं अत्यंत महत्त्वाचं आहे. सिम कार्ड ब्लॉक केल्यास फोनवरील प्रत्येक ते ॲप ब्लॉक करता येतात, जे ओटीपीच्या माध्यमातून ॲक्सेस केले जाऊ शकतात. तुम्ही नवीन सिम कार्डवर जुना नंबर मिळवू शकता. त्यासाठी काही वेळ लागू शकतो, परंतु तुमच्या प्रायव्हसीसाठी आणि मोबाईल वॉलेटच्या सुरक्षेसाठी सिम कार्ड ब्लॉक करणं अत्यंत आवश्यक आहे.

**मोबाईल बँकिंग सर्व्हिस बंद करा**

फोन चोर तुमचे बँक डिटेल्स सहज मिळवू शकतो, त्यामुळे बँक सर्व्हिस तत्काळ बंद करणं आवश्यक आहे. तुमचे सिम कार्ड आणि मोबाईल बँकिंग ॲप सिंक असतात, त्यामुळे रजिस्टर्ड नंबरवरील ओटीपीविना कोणीतही रक्कम ट्रान्सफर करणं कठीण आहे. परंतु फोन हरवल्यावर दोन्ही ब्लॉक करणे उत्तम.



**यूपीआय पेमेंट डीॲक्टिव्हेट करा**

जेव्हा तुम्ही ऑनलाइन बँकिंग सेवेपर्यंत पोहचू देत नाही तेव्हा चोर इतर मार्ग शोधू लागतो, ज्यात यूपीआयसारख्या पेमेंट ऑप्शनचा समावेश असतो. त्यामुळे थोडासाही वेळ न दवडता यूपीआय पेमेंट डीॲक्टिव्हेट करा. यासाठी तुम्हाला तुमच्या बँकेशी संपर्क साधावा लागेल.

**सर्व मोबाईल वॉलेट्स ब्लॉक करा**

मोबाईल वॉलेट्समुळे आयुष्य सोपं झालंय, परंतु जर तुमचा फोन चुकीच्या हाती पडला तर गुगल पे आणि पेटीएमसारखे मोबाईल वॉलेट महागात पडू शकतात. संबंधित ॲपच्या हेल्प डेस्कशी संपर्क करा आणि जोपर्यंत तुम्ही नवीन डिव्हाइसवर वॉलेट पुन्हा सेट करत नाही, तोपर्यंत ते ब्लॉक करण्यास सांगा.

**पोलिसांत तक्रार करा**

या सर्व स्टेप्स फॉलो केल्यावर पोलीस अधिकाऱ्यांना तुमच्या चोरी झालेल्या डिव्हाइसची माहिती द्या. तुम्ही जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये फोन चोरी झाल्याची तक्रार करू शकता आणि एफआयआरची प्रत त्यांच्याकडून घेऊ शकता. जर तुमच्या फोनचा गैरवापर झाला किंवा तुमच्या फोनच्या माध्यमातून पैसे चोरीला गेले तर ही कॉपी पुरावा म्हणून वापरता येईल.



## तूरडाळ पकोडा

**साहित्य :** १ वाटी तूरडाळ, १ कांदा बारीक चिरून, ४ ते ५ लाल मिरच्या, ४ ते ५ कडीपत्ता पाने बारीक चिरून, १ इंच आलेचा तुकडा किसून, चिटूभर हिंग, चवीपुरते मीठ, तेल तळण्यासाठी.

**कृती :** प्रथम तूरडाळ निवडून धुऊन घ्यावी. नंतर किमान दोन तास पाण्यात भिजत ठेवावी. मिक्सर जारमध्ये लाल मिरची घालून त्याची पेस्ट बनवून घ्यावी. नंतर जारमध्ये निथळलेली तूरडाळ घालावी. त्यातच लाल सुमा मिरचीची पेस्ट घालून मिश्रण भज्याच्या पिठाप्रमाणे बनवून घ्यावे. आता तयार पीठ बाऊलमध्ये काढून त्यात बारीक चिरलेला कांदा, कढीपत्ता, आले, हिंग आणि मीठ घालून मिश्रण चांगले एकजीव करून पंधरा मिनिटे झाकून ठेवावे. आता गॅसच्या मध्यम आचेवर कढईत तेल गरम करावे. भज्याचे पीठ परत एकदा हातानेच मिक्स करावे. आच मंद करून भज्याचे पीठ गरम तेलात सोडावे. भजी हलक्या सोनेरी रंगावर आणि कुरकुरीत झाली की, पेपर नॅपकीनवर काढावीत. म्हणजे जादाचे तेल शोषले जाईल. आता तयार गरम तूरडाळ पकोडा चटणी अथवा केचपसोबत खाणस द्या.

## नेलपेंटचा रंग दर्शवतो तुमची पर्सनॅलिटी

**नखं छान दिसावीत म्हणून आपण नखांना अगदी हमखास नेलपेंट लावतो. हल्ली तर इतक्या निरनिराळ्या प्रकारच्या आणि रंगाच्या नेलपेंट्स बाजारात मिळतात की, कोणता रंग आपण लावावा, असा प्रश्न हमखास अनेकांना पडतो. पण तरीही कितीही पेचात असलो तरी शेवटी आपण आपल्या आवडीचा रंग निवडत असतो. तुमच्या नेलपेंटचा रंग तुमची पर्सनॅलिटी दर्शवत असतो. जाणून घेऊया नेमका तुमच्या आवडीचा नेलपेंटचा रंग तुमच्या पर्सनॅलिटीविषयी काय सांगतो ते...**



**गोल्डन/सिल्व्हर रंग :** काहींना ग्लिटरी रंग लावायला आवडतात. असे रंग लावणाऱ्या व्यक्ती कायमच आकर्षित करणाऱ्या असतात. त्यांना कायम लोकांनी आपल्याकडे पाहत राहावे असे वाटते. त्यांचे व्यक्तिमत्त्व तसे असल्यामुळे तसे होतेसुद्धा म्हणा. गोल्डन, सिल्व्हरचे शेड लावणारे लोक म्हणूनच थोडे खास असतात.

**लाल रंग :** काहींना लाल रंगाच्या शेड्स इतक्या आवडतात की, तुम्हाला कायम त्यांच्या बोटांना लाल रंगाचीच नेलपेंट दिसून येते. लाल रंगामुळे तुमची बोटं अगदी चार चौघात उठून दिसतात. असे व्यक्ती फार सेक्सी, धाडसी असतात. कोणत्याही परिस्थितीला सामोरे जाण्याची त्यांची तयारी असते.



**काळा रंग :** हल्ली खूप जण काळ्या रंगाची नेलपेंट लावताना दिसतात. काळा रंग हा ट्रेंडमध्ये असला तरी त्यातून तुमचे व्यक्तिमत्त्व प्रतिबिंबित होते. काळ्या रंगाची नेलपेंट लावणारे लोक कलात्मक असतात. म्हणजे त्यांना कला क्षेत्राची आवड अधिक असते. फॅशन, संगीत अशा क्षेत्रात काम करणारे व्यक्ती असतात. काळा रंग जरी त्यांची पर्सनॅलिटी खुलवत असेल तरी अशी लोक मनाने फारच हळवी असतात.



**गुलाबी रंग :** आता महिलांना सर्वसाधारणपणे नेलपेंटसाठी आवडणारा रंग म्हणजे गुलाबी. आता या गुलाबी रंगातही बरेच शेड्स आहेत. म्हणजे तुम्ही हॉट पिंक हा शेड लावत असाल,तर तुम्ही बोल्ड विचारांचे असता. त्यांच्यातील सद्सद्विवेकबुद्धी चांगली असते. तर फिकट गुलाबी रंग लावणारे हळव्या मनाचे असतात. त्यांना इतरांची काळजी घ्यायला खूप आवडते. अशा व्यक्तींना इतरांची काळजी फार असते.

**निळा रंग :** हल्ली निळा रंगाच्या नेलपेंट्स लावायला अनेकांना आवडते. निळा रंग शांतता आणि सामंजस्याचे प्रतीक असते. अशा व्यक्ती शांत आणि समजूतदार असतात. त्यांना त्याच्या नियमानुसार वागायलाच आवडते. त्यामुळे कोणताही अन्य मार्ग स्वीकारायला तयार नसतात.

**निऑन रंग :** थोडेसे भडक असे निऑन रंग असतात. त्यामध्ये वेगवेगळ्या रंगाची शेड असते. नवीन आयडियाज आणि नवीन आव्हानांसाठी ही लोक तयार असतात. या लोकांमध्ये कमालीची ऊर्जा असते. यांना नेहमी नव्या कल्पना सुचतात.

**न्यूड रंग :** नखांचा रंगाला जाईल असे रंग म्हणजे न्यूड रंग खूप जणांना आवडतात. अशा व्यक्ती फार स्थिर असतात. त्यांना त्यांच्या तत्त्वांना चिकटून राहायला आवडते. त्यांना त्यांचा क्लास मेंटेन करायला आवडते.


### मोबाइल किंवा कॉम्प्युटरच्या सततच्या वापराने

## शरीरावर होऊ शकतात दुष्परिणाम?

**आपण संपूर्ण दिवसभरात अनेक प्रकारची गॅजेट्स वापरत असतो. या गॅजेट्समार्फत जगभरातील घडामोडी अगदी घरबसल्या आपल्याला समजत असतात. पण या गॅजेट्सच्या सतत वापराचा परिणाम आपल्या आरोग्यावर अनेक प्रकारे होऊ शकतो. गॅजेट्सच्या आहारी गेल्याने निद्रानाशासारखे त्रास जाणवू लागल्याचे आपण अनेकदा ऐकत असतो, पण या गॅजेट्समुळे आपल्या शरीरावरही अनेक प्रकारचे दुष्परिणाम होत असतात, याचा विचार करणेही अगत्याचे आहे.**

काही व्यक्तींना मोबाइल किंवा कॉम्प्युटरच्या स्क्रीनकडे पाहताना सतत डोळे बारीक करून पाहण्याची सवय असते. त्यामुळे डोळ्यांच्या अवतीभोवती सुरकुत्या पडू लागतात, तसेच डोळ्यांवरही सतत ताण जाणवू लागतो. त्यामुळे स्क्रीनकडे बघताना डोळे बारीक करून बघणे टाळावे. कॉम्प्युटर किंवा मोबाइल आपल्या शरीराच्या खूप जवळ ठेवणे हे टाळावे. या गॅजेट्समधून बाहेर पडणारे रेडिओमॅग्नेटिक किरण आपल्या शरीरासाठी हानिकारक असतात. तसेच कॉम्प्युटर किंवा मोबाइल स्क्रीनमधील अल्ट्रा व्हायोलेट किरणांमुळे त्वचा आणि डोळे या दोहोंना अपाय होऊ शकतो.कॉम्प्युटर वर काम करताना आपण वापरतो ती खुर्ची आरामदायक असेल असे पहावे. काही व्यक्तींना दिवसभर कॉम्प्युटरवर काम करावे लागते, त्यांनी या गोष्टीची विशेष काळजी घ्यावी. खुर्ची बसण्यास आरामदायक नसेल, तर त्याचा ताण पाठीच्या मणक्यांवर जाणवायला लागून, पाठदुखीचा त्रास सुरू होऊ शकतो. तसेच सतत बसून काम केल्याने पायांकडे होणारे रक्ताभिसरण व्यवस्थित न होऊन, पायांवर सूज येऊ लागते. असे होऊ नये म्हणून थोड्या थोड्या वेळाने जरासे पाय मोकळे करण्यासाठी ऑफिस मध्येच किंवा घरातल्या घरात पायी चालावे किंवा लिफ्टऐवजी जिन्यांचा वापर करावा. अनेक व्यक्तींना मोबाइल फोन खांद्याच्या व कानाच्या मध्ये धरून, एकीकडे काम करत बोलण्याची सवय असते. अशा पद्धतीने जास्त वेळ बोलत राहिल्यास मानेचे दुखणे उद्भवू शकते. तसेच कॉम्प्युटरवर खाली मान झुकवून काम करत असल्यासही मानदुखीचा त्रास उद्भवू शकतो. त्यामुळे कॉम्प्युटरचा स्क्रीन नेहमी आपल्या डोळ्यांसमोर असेल अशा पद्धतीने ठेवायला हवा.

रात्री झोपायच्या अर्धा तास आधीपासून कॉम्प्युटर किंवा मोबाइलचा वापर करणे थांबवावे. त्याऐवजी मन शांत करणारे आपल्या आवडीचे एखादे चांगले पुस्तक वाचावे, किंवा शांत संगीत ऐकावे. त्यामुळे शांत झोप लागण्यास मदत मिळते.



## खास फीचरसह लॉक करा तुमचं सिमकार्ड, फोन हरवल्यावर किंवा चोरी झाल्यावर देखील राहील सुरक्षित

**जर तुम्हाला तुमचा फोन चोरी झाल्यावर किंवा हरवल्यावर सिमकार्ड किंवा नंबरचा गैरवापर टाळायचा असेल, तर सिमकार्ड लॉक करता येईल. हे फीचर अँड्रॉइड आणि आइओएस दोन्हीमध्ये मिळत आहे.**

स्मार्टफोन्समध्ये कितीही फीचर्स असले तरी त्यात खरा जीव सिमकार्ड टाकल्यावर येतो. कॉलिंग असो किंवा एसएमएस आणि मोबाइल डेटाचा वापर करण्यासाठी सिमकार्डची आवश्यकता असते. विशेष म्हणजे तुम्ही हवं असल्यास तुमचं सिमकार्ड लॉक करू शकता, त्यामुळे फोन चोरी झाल्यावर किंवा हरवल्यावर त्याचा गैरवापर करता येत नाही.

स्मार्टफोनवर लॉक सेटअप करतो तसं सिमकार्ड पण लॉक करता येतं. जर तुम्ही हे फीचर इनेबल केलं, तर सिमकार्डचा गैरवापर करता येणार नाही. कोणीही दुसरा युजर तुम्ही सेट केलेला पिन एंटर केल्याविना सिम वापरू शकणार नाही. हे फीचर अँड्रॉइड आणि आइओएस दोन्ही डिवाइसेजमध्ये सहज इनेबल करता येतं.

**अँड्रॉइड फोनमध्ये असं लॉक करा सिम**

- सर्वप्रथम सेटिंग्स ओपन करा आणि मग सिक्युरिटी सेटिंग्स मध्ये जा.
- तिथे सर्वात खाली स्क्रोल केल्यावर मोअर सेटिंग्स वर टॅप करा.
- त्यानंतर सिमकार्ड लॉकची निस्वाद करा आणि पिन सेटअप करा.
- पहिल्यांदा तुम्हाला डिफॉल्ट पिन एंटर करावा लागेल आणि त्यानंतर नवीन पिननं सिमकार्ड लॉक करण्याचा पर्याय मिळेल.
- वेगवेगळ्या टेलिकॉम ऑपरेटर्सचा डिफॉल्ट पिन वेगवेगळा असतो. नवीन पिननं सिमकार्ड लॉक केल्यावर पिन एंटर केल्याविना सिम कार्डचा वापर करता येणार नाही.

## संपादकीय

# शहरांचा श्वास कोंडतोय



संपादक दिपक मोरेश्वर नाईक



औद्योगिक क्रांतीने जितक्या सुखसोयी मिळाल्या तशाच प्रकारे दुसऱ्या बाजूला निरनिराळ्या समस्यांनी मानव जातीपुढे नवी आव्हाने निर्माण केली आहेत. यातील बहुतांश समस्या या मानवनिर्मित आहेत. ज्यावर मात करणे सहजशक्य आहे. पण त्यासाठी दुर्दम्य इच्छाशक्ती आवश्यक आहे. दररोज सकाळ आणि संध्याकाळी गर्दीच्या वेळी होणारी तासन्‌तास वाहतूककोंडी नोकरदारांसाठी आणि वाहनचालकांसाठी नित्याचीच झाली आहे.

राज्यातील प्रमुख शहरांना वाहतूककोंडीने ग्रासले आहे. मुंबई, पुणेसह अनेक शहरांमधील वाहतूककोंडीचा प्रश्न दिवसेंदिवस जटील होऊ लागला आहे. शहरांमधील कोंडी सुटण्याऐवजी दिवसेंदिवस गंभीर स्वरूप पाहायला मिळत आहे. यावर वेळीच उपाय नाही केला तर त्यातून बेसुमार प्रदूषण, श्वसनाचे विकार आणि समाजाचा आर्थिक आणि आरोग्याचा समतोल ढासळण्याचा धोका आहे.

दररोज सकाळ आणि संध्याकाळी गर्दीच्या वेळी होणारी तासन्‌तास वाहतूककोंडी नोकरदारांसाठी आणि वाहनचालकांसाठी नित्याचीच झाली आहे. या कोंडीमुळे दररोज कामाचे हजारो तास वाया जात आहेत. परंतु हा विषय निवडणूक जाहीरनामे, प्रशासनाच्या प्राधान्य क्रमात आढळत नसल्याने लाखो लोक कर्णकर्कश हॉर्न, वाहनांच्या लांबच लांब रांगांतून सुखवस्तू जीवन जगण्याचा आटोकाट प्रयत्न करत आहेत.

गावखेड्यातील लाखो कामगारांचे जत्थे रोजगाराच्या शोधात राज्यातील प्रमुख शहरांमध्ये महिन्याकाठी धडकत असतात. या स्थलांतरित कामगारांमुळे शहरांमधील मूलभूत, पायाभूत सोयीसुविधांवर याचा प्रचंड ताण पडत आहे. परराज्यातून येणाऱ्या अनियंत्रित लोंढ्यांना आवरण्यास सरकार अपयशी ठरले आहे. त्यामुळे शहरांमधील नियोजनाचा बट्ट्याबोळ झालाय. वाहतूककोंडी आणि त्यातून निर्माण होणारे प्रदूषण, कायदा-सुव्यवस्था असे गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. हे प्रश्न सोडविण्याचे केविलवाणे प्रयत्न करण्यात येतात; मात्र समस्येच्या मुळाशी जाण्यात ना राजकीय नेते ना प्रशासनाला रुची आहे. यामुळेच शहरांचे होणारे विद्रुपीकरण झाल्याचे पाहण्यास मिळते.

शहरांमधील वाहतूककोंडी दूर करण्यासाठी विविध प्राधिकारणांमार्फत रस्ते, उड्डाणपूल, मेट्रोसारखे प्रकल्प राबविण्यात येतात. यातून वाहतूककोंडी दूर झाल्याचा भास निर्माण होतो. परंतु प्रत्यक्षात प्रवाशांचा प्रवास सुखकर होईलच, याची शाश्वती नसते. मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक यासह अनेक शहरे नियोजनशून्य बनली आहेत. अरुंद रस्ते त्यावर होणारी कोंडी दूर करण्यासाठी त्याच रस्त्यांवर उड्डाणपूल, मेट्रो मार्ग उभारण्यात येतात. त्यामुळे रस्ते आणखी अरुंद होऊन वाहतुकीला अडथळे निर्माण करतात. कार्यालयीन वेळेत सकाळ-सायंकाळी वाहनांच्या गदीर्तून प्रवास करताना नोकरदारांकडून सरकारविरोधात प्रचंड संताप व्यक्त करण्यात येत आहे. शहरांमधील वाहतूककोंडी दूर करण्याचा प्रयत्न वाहतूक पोलिसांकडून केला जातो; मात्र वाहनांच्या अफाट संख्येमुळे त्यांचेही प्रयत्न तोकडे ठरत आहेत.

देशाच्या आर्थिक विकासात वाहन उद्योगाचा महत्त्वाचा वाटा आहे. दुचाकी, तीन, चार चाकी मोटारींबरोबर बस, ट्रकच्या संख्येत वषार्नुवर्षे वाढ होत आहे. त्या तुलनेत शहरांमधील रस्त्यांची रुंदी वाढलेली नाही. शहरात नव्याने रस्ते तयार केले जात नाहीत. त्यामुळे केवळ राज्यातील मुंबई, पुणे शहर नव्हे, तर देशभरातील मेट्रो शहरे वाहतूककोंडीचा सामना करत आहेत. देशात दरदिवशी शेकडो किलोमीटरचे नवे मार्ग तयार होत असले, तरी शहरांमधील कोंडी फुटू शकलेली नाही. याउलट शहरांमधील कोंडी दिवसेंदिवस अक्राळविक्राळ स्वरूप धारण करू लागली आहे.

राज्यातील शहरांमधील वाहतूक नियोजनाची घडी विस्कटली असतानाच आता ग्रामीण भागातील तालुके आणि त्यामधील मोठ्या शहरांना वाहतूककोंडीने ग्रासले आहे. गावे आणि लहान शहरांचे नियोजन करण्याकडे कोणी गांभीयार्ने पाहत नसल्याने भविष्यात लहान शहरांचा श्वास वाहतूककोंडीत घुसमटून जाण्याची शक्यता आहे.

शहरांमधील वाढती लोकसंख्या आणि त्यासोबतच वाढणारी वाहने वाहतूककोंडीला कारणीभूत ठरत आहेत. वाहन शौकीन नवीन मॉडेल्स बाजारात दाखल होताच त्याची खरेदी करतात. उद्योजकांकडे आणि अति श्रीमंत कुटुंबांमध्ये कुटुंबातील प्रत्येक सदस्याच्या एक-दोन नव्हे, तर पाच ते सहा मोटारी असतात. या वाहनांचा जत्था रस्त्यावर एकाच वेळी येत असल्याने कोंडी निर्माण होते. मुंबईत आलिशान भागांतील लोकांच्या महागड्या गाड्या धारावीसारख्या भागात पार्किंग केल्या जातात. पार्किंगवरून सोसायट्यांमध्ये वाद होऊ लागले आहेत. महापालिकांची पार्किंगविषयक धोरणे कालबाह्य झाली आहेत. परिणामी वाहतूककोंडी आणि वाहनांचे पार्किंग हा मुद्दा आणखी गंभीर बनला आहे. नव्याने निर्माण होणाऱ्या गृहनिर्माण प्रकल्पांमध्येही घर खरेदीदारांना पार्किंगच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे.

वाहन खरेदी करणाऱ्या ग्राहकाकडून सरकारला कर महसूल मिळतो. परंतु वाढत्या वाहनांच्या संख्येमुळे निर्माण होणाऱ्या समस्येवर सरकार विचार करताना दिसत नाही. त्यामुळे प्रवासी आणि वाहन खरेदीदार वारयावर असल्याचे पाहण्यास मिळते. राज्यात जानेवारी २०२४ मध्ये ४.५८ कोटी वाहने होती. २०२३च्या वाहन संख्येत २०२४ मध्ये ५.८ टक्के वाढ झाली. मुंबईत २०२४ मध्ये वाहनांची संख्या ४८ लाखांवर गेली आहे. यामध्ये १४ लाख कार, तर २९ लाख दुचाकींचा समावेश आहे. मुंबईतील चार प्रादेशिक परिवहन कार्यालयात दररोज सुमारे ७३० वाहनांची नोंदणी होते. पश्चिम उपनगरात सर्वाधिक २१ लाख, शहरामध्ये १४ लाख आणि पूर्व उपनगरात १३ लाख वाहने आहेत. यातच रस्त्यावर फेरीवाले, अनधिकृत बांधकामे वाहतूककोंडीस कारणीभूत ठरत आहेत. यामुळे शहरातील ध्वनी, वायू प्रदूषणात प्रचंड वाढ होत आहे.

दिवसेंदिवस वाढणाऱ्या वाहनांमुळे शहरे वाहतूककोंडीत सापडली आहेत. या कोंडीतून मार्ग काढताना नागरिक हैराण झाले आहेत. या कोंडीवर वेळीच उपाय केला नाही तर सामाजिक वातावरण कलुषित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पण आपल्याच धुंदीत असणारे राजकारणी, प्रशासन झोपेतून कधी जागे होणार?

# पंगुत्वाचे मार्केटिंग



गतिमंद किंवा मनोरुग्ण अशा व्यक्तींच्या अंगात अद्भुत शक्ती आहे, दैवी संचार आहे, ते विदेही अवलिया आहेत, असे म्हणण्याची पद्धत आहे. अशा दिव्यांग लोकांचे नातेवाईक किंवा सोबतचे लोक त्यांचा वापर करून भोंदूगिरीचा व्यवसाय सुरू करतात. त्यामुळे त्यांच्याबद्दल लोकांच्या मनात पूज्य भाव उत्पन्न होतो.

भोंदू बाबा-बुवा यांचे मानसशास्त्रीय विश्लेषण करावयाचे झाल्यास यामध्ये प्रामुख्याने दोन टोके दिसून येतात. एक तर हे लोक अत्यंत धूर्त, चतुर व विज्ञान तंत्रज्ञान अभिनय वक्तृत्व यात पारंगत असतात. परंतु त्याचा दुरुपयोग करून लोकांना फसवणारे असतात. अन्यथा दुसऱ्या टोकाचे लोक गतिमंद किंवा मनोरुग्ण असतात. अशा दिव्यांग लोकांचे नातेवाईक किंवा सोबतचे लोक त्यांचा वापर करून भोंदूगिरीचा व्यवसाय सुरू करतात. जी व्यक्ती मनोरुग्ण आहे किंवा गतिमंद आहे, अशा व्यक्तीला अनेकदा त्यांचे असे स्वतःचे मत नसते. त्यांना मुळातच सभोवताली काय चालले आहे याचे भानच नसते. त्यामुळे त्यांचा कोणीतरी वापर करून घेत आहे हेही त्यांना समजत नाही. अशा व्यक्ती अनेकदा स्वतःची शारीरिक स्वच्छता सुद्धा नीट ठेवू शकत नाहीत. सामाजिक नियम यांची जाण सुद्धा त्यांना नसते.

मात्र पारंपरिक भारतीय समाजात अशा व्यक्तींच्या अंगात अद्भुत शक्ती आहे, दैवी संचार आहे, ते विदेही अवलिया आहेत, असे म्हणण्याची पद्धत आहे. त्यामुळे त्यांच्याबद्दल लोकांच्या मनात पूज्य भाव उत्पन्न होतो. याचा वापर करून अशा दिव्यांग व्यक्तीला बाबा, बुवा वा माता बनविले जाते. अशा व्यक्तीच्या पाया पडणे, पूजणे सुरू होते. हळूहळू त्या व्यक्तीसमोर दक्षिणा, नारळ, हार, फुले ठेवली जातात. त्यांना एक हात वर करून आशीर्वाद द्यायला शिकवले जाते. कधी कधी समोरच्या व्यक्तीच्या डोक्यावर पाय ठेवूनही आशीर्वाद द्यायला शिकवले जाते.

अशा दिव्यांग व्यक्तींचा वापर करून काही लोक बुवाबाजीचा धंदा सुरू करतात. यात मग त्या व्यक्तीचे नातेवाईक सुद्धा असू शकतात किंवा इतर लोकही असा फायदा उचलण्यासाठी त्या व्यक्तीला जवळ करतात. त्यांचा हेतू या दिव्यांग व्यक्तीचा वापर करून स्वतःचा आर्थिक फायदा करून घेणे हाच असतो. स्वतःच्या तुंबड्या भरण्याची एक मोठी यंत्रणाच ही हितसंबंधी टोळी तयार करीत असते. अशा बाबांना ते मनोरुग्ण असले, तरी ते मनोरुग्ण आहेत, असे म्हणणे हा फार मोठा श्रद्धेवरचा आघात आहे, असा कांगावा केला जातो.

परमेश्वर अवतार घेतो, अशी हिंदू धर्मात कल्पना आहे. बुवाबाजीला लोकमान्यता मिळवून देण्यासाठी या कल्पनेचा आधार भोंदूगिरीत केला जातो. अनेकदा नीट निरीक्षण केले असता असे दिसून येते की, अशा बाबाच्या चेहऱ्यावरील हावभाव अत्यंत असंबद्ध असतात. त्यांच्या शारीरिक हालचाली सुद्धा अत्यंत विकृत असतात. जसे की, ऑटिझम स्पेक्ट्रम डिसऑर्डर असलेली व्यक्ती काही शारीरिक हालचालींची वारंवार पुनरावृत्ती करते. हात विशिष्ट पद्धतीने हलवणे किंवा अंग हलवणे, काही विचित्र हालचाली करणे, झुलणे, एकाच ठिकाणी टक लावून पाहणे इ. असंख्य लक्षणे या भोंदू बाबांमध्येही दिसून येतात. मनोविकारतज्ज्ञ किंवा मानसोपचार तज्ज्ञ व्यक्तींना हे निरीक्षणाने लगेच कळून येते. सर्वसामान्य माणसांना सुद्धा पाहिल्यावर खरे पाहता हे समजते. परंतु दिव्य व्यक्ती अशाच असतात, त्यांचे देवाशी संभाषण चालू असते, म्हणून त्या तशा वागतात, अशी समजूत काढून त्यांच्या दैवी शक्तीवर काही लोक विश्वास ठेवतात.

आपल्या देशात अशा अनेक दिव्यांग लोकांना बाबा बनवून अनेक दुकाने, धंदे थाटले गेले आहेत. या दिव्यांग व्यक्ती नीट संभाषण सुद्धा करू शकत नाहीत. काहीही बडबड करीत असतात. ती बडबड अनेकदा अर्थहीन असते. परंतु अशा वेळी ते देवाशी बोलत आहेत, असा अर्थ काढला जातो किंवा ते जे काही वारंवार बडबड करतात, त्याचा ओढूनताणून काहीतरी विपर्यास करून अर्थ काढला जातो आणि भक्तांना तो त्यांचा दिव्य संदेश आहे, असे सांगितले जाते.

असे बुवा, बाबा, माता या त्यांच्या दरबारात काहीही करत असतात. एक बाबा सापासारखी जीभ हलवून फूस-फूस आवाज काढून शरीरसुद्धा सापाप्रमाणे डोलवत असे. अशी एक माता होती जी एकाच वेळी अनेक विडी घेऊन धूम्रपान करत भक्तांना आशीर्वाद द्यायची. एक बाबा झाडपाल्याने समोरच्याला जोरजोरात मारायचा आणि लोक ते सर्व आशीर्वाद समजून घ्यायचे. त्यामुळे जे लोक सारासार विचार, तार्किकदृष्ट्या काहीही विचार न करता अंधपणे समोरच्याचे ऐकतात ते अशा मनोविकृत भोंदू बाबांच्या आहारी जातात.

दिव्यांग व्यक्तींना योग्य उपचार पुनर्वसन यांची नितांत गरज असते. त्यामुळे अशा व्यक्तींचा कोणी भोंदूगिरीत वापर करीत असेल, तर ते अत्यंत अमानवी आणि चुकीचे आहे. दिव्यांग मुलांच्या संस्थांमध्ये अन्नदान करून, आर्थिक सहाय्य करून, त्यांना सहकार्य सत्कर्म करणे जास्त विवेकी ठरेल. म्हणून लोकांनी अशा दिव्यांग व्यक्तीचा वापर जर कोणी भोंदूगिरीत करीत असेल, तर त्यांची तक्रार करून त्या दिव्यांग व्यक्तीची सुटका केली पाहिजे.

खरे पाहता मनोविकृत लोकांमध्ये दिव्य शक्ती असते, असा समज करूनच त्यांना दिव्यांग असे संबोधले गेले. २०१५मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अपंग शब्द न वापरता दिव्यांग असा शब्द रूढ केला. परंतु युनायटेड नेशन्स कमिटी ऑन द राइट्स ऑफ पर्सन विथ डिसॅबिलिटीजने 'दिव्यांगजन' हा शब्द विवादास्पद आणि 'मानसिकदृष्ट्या आजारी' सारख्या अपमानजनक शब्दांप्रमाणेच असल्या कारणाने त्यावर आक्षेप घेतला. काही अपंगत्व अधिकार कार्यकर्त्यांनी हा शब्द निंदनीय आणि अपमानास्पद असल्याची टीका केली आहे.

मानसिक विकलांग व्यक्तीला अलौकिकता बहाल करून फसवणूक करणे हे 'महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ठ व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंध व उच्चाटन कायदा २०१३' अंतर्गत कायदेशीर गुन्हा आहे. एखाद्या मानसिक विकलांग व्यक्तीमध्ये अमानवी शक्ती असल्याचे भासवून त्याद्वारे अन्य व्यक्तींची लुबाडणूक करणे हे या कायद्यानुसार गुन्हेगारी वर्तन ठरते. सदर कायद्याबद्दल जागरूकता येणे अत्यंत गरजेचे असून, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती या विषयावर अनेक ठिकाणी कार्यक्रम घेऊन, पुस्तिका काढून, व्याख्याने देऊन प्रबोधन करीत असते.

स्वतःचे प्रश्न काय आहेत, ते कसे सोडवायचे, ते कुठेपर्यंत सुटू शकतात याचे भान आपल्याला वैज्ञानिक दृष्टिकोन व विवेकवाद याचा वापर करून येते. संबंधित विषयातील तज्ज्ञ व्यक्तीच्या सहाय्यानेच समस्या सोडविणे गरजेचे असते. तरच समाज बुवाबाजीपासून दूर राहू शकेल. साडेतीनशे वर्षांपूर्वी तुकोबांनी परखडपणे लिहिले आहे.

ऐसे कैसे झाले भोंदू,
कर्म करोनी म्हणती साधू
अंगा लावूनिया राख,
डोळे झाकुनी करती पाप
दावून वैराग्याची कळा,
भोगी विषयाचा सोहळा
तुका म्हणे सांगू किती,
जळो तयांची संगती।

# बिबट्यांची नसबंदी गरजेची?



गेल्या अनेक महिन्यांपासून बिबट्यांची नसबंदी करण्याची चर्चा केली जात आहे. यासंदर्भात खासदार अमोल कोल्हे यांनी संसदेत माणसांवर होत असलेल्या हल्ल्यांबाबत बिबट्यांच्या नसबंदीच्या पयार्याचा विचार करावा ही मागणी केंद्रीय वनमंत्र्यांकडे केली. अशीच मागणी करणारी एक याचिका उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. काही जिल्ह्यातील समस्येमुळे ही मागणी आता राज्यभर जोर धरू लागली आहे. पुणे जिल्ह्यातील केडगाव गावात एका गुऱ्हाळावर मोरे दाम्पत्य ऊस तोडणीचे काम करत होते. वषार्नुवर्षे काम करत असलेल्या या दाम्पत्याला नुकतेच एक बाळ झाले होते. छोट्या विष्णूचा जन्म झाल्यानंतर काही महिन्यांत त्याची आई कामावर रूजू झाली. विष्णूला उसाच्या फडात झोळी करून झोपवायचे आणि काम करायचे, हा या दाम्पत्याचा दिनक्रम होता. मागच्या महिन्यात नेहमीप्रमाणे मोरे दाम्पत्य गुऱ्हाळावर ऊसतोडणीसाठी आले. उसाच्या फडात झोळी बांधून विष्णूला त्यात झोपवले आणि दोघेही कामाला लागले. काही वेळाने विष्णूची आई झोळीकडे जात असताना अचानक तिच्या हंबरड्याचा आवाज आला. सगळे मजूर काय झाले हे बघायला धावले. विष्णूला त्याच्या आईसमोरून एक बिबट्या झोळीतून उचलून नेत होता. तीन महिन्यांच्या विष्णूचा रडण्याचा आवाज असह्य करणारा होणारा होता. काम करत असलेल्या एका मजुराने धाडसाने बिबट्याच्या मागे धावून बिबट्याच्या तोंडातून विष्णूला सोडवले. विष्णू जखमी झाला होता. त्याला जवळच्याच रुग्णालयात दाखल करण्यात आले. पण बिबट्याच्या दात आणि नखांमुळे झालेल्या जखमा खोलवर गेल्या होत्या. त्याच्या गळ्याची मुख्य धमणी तुटल्याने रक्तस्राव छातीत उतरला होता. डॉक्टरांनी अनेक प्रयत्न करूनही विष्णूला वाचवता आले नाही. बिबट्याच्या हल्ल्यात तीन महिन्यांच्या विष्णूचा मृत्यू झाला. या घटनेनेनंतर हळहळ व्यक्त केली गेली. पण या भागातली महिन्याभरातली ही तिसरी घटना होती. लहान मुलांवरचे बिबट्याचे हल्ले वाढले आहेत. त्यासाठी बिबट्यांची नसबंदी करून त्यांची संख्या नियंत्रणात आणावी, ही मागणी केली जात आहे.

खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी संसदेच्या अधिवेशनात बिबट्यांची वाढती संख्या रोखण्यासाठी ह्यबिबट्या प्रजनन नियंत्रण धोरणह्ण लागू करण्याची मागणी केली होती. तसेच केंद्रीय वनमंत्री भूपेंद्र यादव यांच्याकडे या मागणीचा पाठपुरावा केला. त्यानुसार केंद्रीय वनविभागाच्या अतिरिक्त महासंचालकांनी या विषयीचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश राज्याच्या मुख्य वनसंरक्षकांना दिले होते. जुन्नर उप वनविभाग क्षेत्रातील जुन्नर, आंबेगाव, खेड आणि शिरूर तालुक्यात बिबट्यांकडून सातत्याने होत असलेल्या हल्ल्यात अनेकांना जीव गमवावा लागला. वनविभागाच्या अतिरिक्त महासंचालकांच्या निर्देशानुसार राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक महीप गुप्ता यांनी बिबट्याप्रवण क्षेत्रातील गावांचे सर्वेक्षण करून मानव-बिबटे संघर्ष कसा कमी करता येईल याचा अभ्यास केला. त्यानुसार ह्यवाइल्ड लाइफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाह्ण आणि वन्यजीव तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक पातळीवर ११ नर आणि ३६ मादी बिबट्यांवर गर्भनिरोधक उपाययोजना करण्याचा प्रस्ताव केंद्रीय वनविभागाच्या अतिरिक्त महासंचालकांकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. या प्रस्तावात वन्यजीव संस्थेच्या सहकायार्ने नर आणि मादी बिबट्यांच्या ग्रंथींचा अभ्यास व गर्भनिरोधन यावर भर देण्यात येणार आहे. त्याचबरोबर बिबट्याप्रवण क्षेत्रातील बिबट्यांच्या हालचाली, खाद्य या बाबींचाही अभ्यास केला जाणार आहे. ही उपाययोजना देशात प्रथमच होणार असल्याने याचा परिणाम केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित न राहता, देशभरातील बिबट्याप्रवण क्षेत्रांसाठी परिणामकारक ठरू शकतो. तसेच, बिबट्यांच्या हालचाली, खाद्यसाखळी आणि पर्यावरणीय परिस्थितीचा अभ्यास केल्याने मानव-बिबट्या संघर्ष कमी करण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो. हा प्रस्ताव सध्या जुन्नरसाठी आहे, मात्र राज्यभर याचा विचार केला जावा असा पर्याय आमदार सत्यजीत तांबे यांनी नुकत्याच पार पडलेल्या अधिवेशनात सुचवला. यावेळी त्यांनी नगर जिल्ह्यातील बिबट्याच्या हल्ल्यांची आकडेवारी वाचली. गेल्या पाच वर्षांत एकट्या नगर जिल्ह्यात बिबट्यांच्या हल्ल्याच्या १४ हजार ४०० घटनांची नोंद झालेली आहे. त्यात पशुधन हानीची संख्या १४ हजार २४९ इतकी होती. हा प्रकार अतिशय गंभीर असून बिबट्यांची नसबंदी हा एकच पर्याय आता उरला आहे, असे त्यांनी सांगितले आहे.

जुन्नरच्या या प्रस्तावाला मंजुरी मिळाली तर बिबट्यांच्या संख्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी मदत होणार आहे. मात्र, याचे दुष्परिणामदेखील आहेत. मादीची नसबंदी केल्यास बिबट्याच्या मानसिकतेवर परिणाम होऊन तो आक्रमकदेखील होऊ शकतो, असे अभ्यासकांचे म्हणणे आहे. महाराष्ट्रातील संरक्षित वनक्षेत्रांमध्ये बिबट्यांची संख्या सुमारे एक हजार ९८५ असल्याचे वनविभागाच्या अहवालामधून स्पष्ट झाले आहे. २०१८ साली ही संख्या एक हजार ६९० होती. आता २०२२ मध्ये यात १२२ बिबट्यांची भर पडली आहे. राज्यातील संरक्षित क्षेत्रांमध्ये आढळणाऱ्या एकूण संख्येपैकी जवळपास ७५ टक्के संख्या ही संरक्षित वनक्षेत्राबाहेर राहत असल्याची महत्त्वपूर्ण नोंद अहवालात आहे. सह्याद्री भूप्रदेशाचा विचार करता सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील बिबटे अधिवासाच्या घनतेमध्ये वाढ झाली आहे. माणसांवर होणारे बिबट्यांचे हल्ले थांबवले पाहिजेत, पण त्यासाठी बिबट्यांची नसबंदी हा पर्याय योग्य आहे का? याबाबत अनेक पर्यावरण तज्ज्ञांनी त्यांची मते मांडली आहेत. जो बिबट्या जंगल सोडून गावात, शेतात आला आहे, त्याची मोजणी कशी करणार? तो एक मोठा संशोधनाचा विषय आहे. बिबट्या हा अत्यंत चपळ प्राणी असल्याने त्याला पकडणे शक्य नाही. त्यामुळे पकडून त्याची नसबंदी करणे, हे काहींना अशक्य वाटते. नसबंदी करायची ठरवली तरी ते खूप खर्चिक असेल. त्यामुळे बिबट्यांची अंशतः शिकार हाच त्यांची संख्या कमी करण्यावर किंवा त्यांच्या संख्येवर मयार्दा घालण्यासाठीचा उपाय असू शकतो.

जर बिबट्याने माणसावर हल्ला केला तर वन अधिकाऱ्याला तत्काळ घटनास्थळी जाऊन पंचनामा करावा लागतो. त्यानंतर त्या बिबट्याचा शोध घेतला जातो. तो सापडलाच तर त्याला रेस्क्यू केंद्रामध्ये आणावे लागते. बिबट्या आणि जखमी माणूस यांची काळजी घ्यावी लागते. त्यामुळे अधिकाऱ्यांना बिबट्यांची नसबंदी हाच योग्य पर्याय वाटतो. मात्र या मागणीला पर्यावरणवादी विरोध करतात. माजी केंद्रीय मंत्री तसेच प्राणी हक्क संरक्षण कार्यकर्त्या मनेका गांधी यांनी हा पर्याय व्यवहार्य नाही, असे सांगितले आहे. बिबट्या नष्ट करण्याचा प्रयत्न करण्याऐवजी रानडुक्कर, ससे आदी बिबट्यांच्या नैसर्गिक भक्ष्यांची अवैध शिकार थांबविण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे, असे मनेका गांधी यांचे म्हणणे आहे. पण माणसांवर होणारे बिबट्यांचे हल्ले थांबवण्यासाठी लवकरात लवकर उपाययोजना करणे हे अत्यंत गरजेचे आहे, हेही तितकेच खरे. अन्यथा अनेक जीव जाण्याचा हा धोका भविष्यात वाढतच जाणार आहे.

पोलीस बातमी पत्र
संमिश्र
4
मुंबई, मंगळवार, ०७ जानेवारी ते १३ जानेवारी २०२५

# ठाणे कारागृहातील बंद्याची करामत
## सँडेलच्या सोलमध्ये लपवून आणला होता मोबाईल




**■ ठाणे :** ठाणे मध्यवर्ती कारागृहातील एका न्यायबंद्याने सँडेलच्या सोलमधून मोबाईल आणल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी न्यायबंद्याविरोधात ठाणेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ठाणे मध्यवर्ती कारागृहात शेकडो बंदीवान आहेत. तसेच अनेक मोठे कैदी देखील या कारागृहात आहेत. ३० डिसेंबरला कारागृहातील झडती पथक बॅरेक क्रमांक तीनमध्ये झडती घेत होते. या बॅरेकमध्ये २०० न्यायबंदी होते. झडती घेत असताना बॅरेकमधील भिंतीवर खिळ्याला अडकविलेली पिशवी होती. या पिशवीत सँडेलचा जोड ठेवल्याचे झडती पथकाला आढळले. त्यामुळे पथकातील कर्मचाऱ्यांनी सँडेलचे वजन तपासले. यातील डाव्या पायातील सँडेल उजव्या पायातील सँडेलपेक्षा जास्त वजनाचा आढळून आला. पथकाला संशयास्पद आढळून आल्याने त्यांनी याबाबतची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिली. वरिष्ठांच्या आदेशानंतर सँडलचे सोल काढले असता, त्यामध्ये एक मोबाईल आढळून आला. मोबाईलची तपासणी प्रशासकीय विभागात करण्यात आल्यानंतर मोबाईल बंद अवस्थेत होते. तसेच त्यामध्ये सीमकार्डही नव्हते. पथकाने मोबाईलबाबतची माहिती घेतली असता, हा मोबाईल प्रथमदर्शनी काशिमीरा पोलीस ठाण्यातील एका प्रकरणामधील न्यायबंदी असल्याचे समोर आले. हा न्यायबंदी सप्टेंबर २०२३ पासून कारागृहात आहे. त्याच्याविरोधात ठाणेनगर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम २४५ तसेच कारागृह कायदा १८९४ कलम ४२, ४५ (१२) नुसार गुन्हा दाखल झाला आहे.

# ड्रग्ज घेऊन पाकिस्तानी नागरिक भारतात
## 10 वर्षांनी मिळाली 20 वर्षांची शिक्षा




### तटरक्षक दलाची कारवाई

भारतीय तटरक्षक दलाच्या ह्यसंग्रामह्ण या जहाजाचे तत्कालीन कमांडिंग ऑफिसरनी विशेष एनडीपीएस न्यायालयात उपस्थित राहून संपूर्ण घटना सांगितली. अल यासिर जहाज कशापद्धतीने पकडण्यात आले आणि जहाजावरील आरोपींना पकडण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. पाकिस्तानी जहाज अल यासिरवरून पकडण्यात आलेले कर्मचारीच न्यायालयात आरोपी म्हणून हजर असल्याचे त्यांनी सांगितले होते.

**■ मुंबई :** अरबी समुद्राच्या मार्गे भारतात हेरॉईनची तस्करी केल्याप्रकरणी पकडण्यात आलेल्या आठ पाकिस्तानी नागरिकांना विशेष एनडीपीएस न्यायालयाने दोषी ठरवले. आणि २० वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली आहे. हे प्रकरण २०१५ मधील आहे.

कराचीतून भारतीय सागरी हद्दीत आलेल्या 'अल यासिर' जहाजाशी हे प्रकरण संबंधित आहे. २३२ किग्रॅ. हेरॉईनसह भारतीय तटरक्षक दलाने हे जहाज पकडले होते. या हेरॉईनची किंमत ६.९३ कोटी असल्याचे सांगण्यात आले होते. या प्रकरणी आठ जणांना अटक करण्यात आली होती.

या आरोपींमध्ये अलीबख्शा सिंधी, मकसूद मासिम, मोहम्मद नाथो, मोहम्मद अहमद इनायत, मोहम्मद युसूफ गगवानी, मोहम्मद युनूस सिंधी, मोहम्मद गुलहसन सिंधी आणि गुलहसन सिद्दीक सिंधी यांचा समावेश आहे. हे सगळे आरोपी २०१५ पासून मुंबईच्या तुरुंगात आहेत.

१८ ऑगस्ट २०२२ रोजी या प्रकरणाशी संबंधित ११ मोठे निळे प्लास्टिक ड्रम येलो गेट पोलीस स्टेशन येथून मुंबई सत्र न्यायालयात आणण्यात आले. २०१५ मध्ये याच ड्रममधून २३२ किलो हेरॉईनची तस्करी करण्यात आली होती.

विशेष एनडीपीएस न्यायालयाने या सर्व आरोपींना एनडीपीएस कायद्या अंतर्गत दोषी ठरवत २० वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली. या शिक्षेमुळे भारतात ड्रग्जची तस्करी करणाऱ्यांना थेट संदेश देण्यात आला आहे. भारतीय तटरक्षक दल तसेच अन्य सुरक्षा यंत्रणांच्या सतर्कतेचा हा परिणाम आहे.

# थकबाकी असलेल्या अडीच हजार नळ जोडण्या महापालिकेकडून खंडित

**■ ठाणे :** ठाणे महापालिकेने पाणी देयके थकविणाऱ्या ग्राहकांविरोधात कठोर कारवाईस सुरूवात केली आहे. डिसेंबर महिन्यात महापालिका क्षेत्रात २ हजार ६०६ नळ जोडण्या खंडित केल्या असून ४११ मोटर पंप जप्त केले आहेत. तसेच, ७३ पंप रुम सील करण्यात आले आहेत. २ हजार ३३० थकबाकीदारांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. ठाणे महापालिका क्षेत्रात ठाणे ते दिवा ही शहरे येतात. महापालिकेची पाणी पुरवठा देयकांची रक्कम सुमारे २२५ कोटी रुपये आहे. त्यापैकी, ७६ कोटी रुपये ही थकबाकी असून चालू वर्षाची देयक रक्कम ही १४८ कोटी रुपये आहे. त्यामुळे ठाणे महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने पाणी देयकाची थकबाकी भरणे टाळणाऱ्यांची नळ जोडणी खंडित करून पाणी पुरवठा बंद करण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार, डिसेंबर महिन्यात महापालिका क्षेत्रात २ हजार ६०६ नळ जोडण्या खंडित केल्या असून ४११ मोटर पंप जप्त केले आहेत. तसेच, ७३ पंप रुम सील करण्यात आले आहेत. पाणी देयकाच्या साप्ताहिक



वसुलीचे लक्ष्य निर्धारित करून पाणी देयक वसुली अभियान सुरू करण्यात आले आहे. त्यानुसार, पाणी देयकाच्या थकबाकीसह वसुलीसाठी महापालिकेच्या सर्व प्रभागात नळजोडणी खंडीत करणे, मोटर पंप जप्त करणे, मीटर कक्ष सील करण्यात येत आहेत.

तसेच, पाणी देयकाचा भरणा करण्याऐवजी खंडित नळ जोडणी परस्पर पुन्हा कार्यान्वित करुन घेतल्यास गुन्हे दाखल करण्याचे निर्देश पाणी पुरवठा विभागाच्या कर्मचाऱ्यांना देण्यात आले आहेत. विभागाने एप्रिल ते डिसेंबर या काळात ७७.९८ कोटी रुपयांची देयक वसुली केली. तर पाणी पुरवठा विभागातर्फे राबविण्यात आलेल्या धडक मोहिमेत डिसेंबर महिन्यात २१.८५ कोटी रुपयांची वसुली करण्यात आली आहे. प्रभाग समितीतील पाणी पुरवठा विभागाच्या अभियंत्यांच्या नेतृत्वात पाणी देयक वसुलीची मोहीम राबविण्यात येत आहे. तसेच, पाणी देयक वसुलीत हयगय करणारे कनिष्ठ अभियंता आणि मीटर तपासणीस यांच्यावर कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. नागरिकांनी वेळेत पाणी पुरवठ्याची देयके भरण्याचे आवाहन ठाणे महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाचे उपनगर अभियंता विनोद पवार यांनी केले आहे.

# व्यावसायिक डीमॅट खात्याच्या नावाखाली ५२ लाखांची सायबर फसवणूक




**■ मुंबई :** शेअर्स खरेदी -विक्री व्यावहारातून नफा मिळवण्यासाठी व्यावसायिक डीमॅट खाते उघडण्यास सांगून गोरेगावमधील रहिवाशाची ५२ लाख ५० हजार रुपयांची सायबर फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या मागे सराईत टोळीचा हात असल्याचा संशय असून बँक व्यवहारांच्या माध्यमातून पोलीस याप्रकरणी तपास करीत आहे. एकट्या मुंबईत नोव्हेंबर महिन्यापर्यंत ५५ हजार जणांनी सायबर फसणूक झाल्याच्या तक्रारी केल्या असून त्यात सुमारे १२०० कोटी रुपयांची फसवणूक झाली आहे.

गोरेगाव (पूर्व) परिसरात वास्तव्यास असलेले ५२ वर्षीय तक्रारदारांना २४ सप्टेंबर रोजी अनामिका नावाच्या महिलेचा दूरध्वनी आला होता. तिने शेअर्स खरेदी - विक्री व्यवहाराविषयी माहिती देऊन ग्रँड इंटरप्रायजेस या व्हॉट्स ॲप ग्रुपवर तक्रारदाराला सहभागी केले. त्या ग्रुपचे चार ॲडमिन होते. आपण प्रॉफीट पल्स इंडियासाठी काम करीत असल्याचा दावा त्यांनी केला. त्यात दिलेल्या माहितीच्या आधारे तक्रारदाराने त्याच्या स्वतःच्या डिमॅट खात्यावरून ट्रेडिंग करण्यास सुरूवात केली. त्यांना काही नफाही झाला. आपल्यामार्फत व्यावसायिक डिमॅट खाते उघडल्यास अधिक फायदा होईल, असे आरोपींनी तक्रारदाराला सांगितले. त्याबाबत एक ई-मेलही पाठवला. अखेर त्यांना एक ग्राहक क्रमांक देण्यात आला. त्या क्रमांकावरून तक्रारदाराच्या नावाने व्यावसायिक डीमॅट खाते उघडण्यात आले. तक्रारदाराने सुरूवातीला त्यात पाच हजार रुपये जमा केले. त्यानंतर ५० हजार रुपये जमा केले. त्यांना चांगला नफा झाल्याचे स्क्रीन शॉट्स तक्रारदाराच्या व्हॉट्सॲप क्रमांकावर पाठवण्यात आले. त्यानंतर तक्रारदाराने व्हॉट्सॲप ग्रुपवर सांगितल्याप्रमाणे पैसे जमा करण्यास सुरूवात केली. त्यावेळी तक्रारदाराने गुंतवणूक केलेल्या ५२ लाख ५० हजार रुपयांचे ९५ लाख २७ हजार रुपये झाल्याचे निदर्शनास आले. चांगला नफा झाल्यामुळे तक्रारादाराने ती रक्कम काढण्याची विनंती केली. त्यावेळी २१ टक्के कमिशन व जीएसटी कर भरावा लागेल, असे सांगण्यात आले.

तक्रारदाराला संशय आल्यामुळे त्यांनी संबधित मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला असता त्यांना प्रतिसाद मिळाला नाही. अखेर त्यांनी याप्रकरणी १९३० या सायबर हेल्पलाईनवर दूरध्वनी केला. सायबर पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करून तपासाला सुरूवात केली. तक्रारदाराने उपलब्ध केलेल्या बँक खात्यांच्या माध्यमातून पोलीस याप्रकरणी तपास करीत आहेत.

## वसई विरार शहर महानगरपालिका

जा.क्र : ववशिम/प्रससी/जाहिरात/०४/२०२५ दिनांक ०६/०१/२०२५

वसई विरार शहर महानगरपालिका अधिनियम 1949 चे अधिसुचीतील प्रकरण 8 मधील कलम 1(1) व 1(2) अन्वये व 469 च्या नुसार जाहिर नोटीस खालिल मालमत्तेच्या हस्तांतरणा संबधित वसई विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय विरार येथे प्राप्त मालमत्ता प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून 15 दिवसांचे आत हितसंबधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यास विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालयात लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी हस्तांतरण करुन महानगरपालिका याबाबत नोंद घेतली जाईल.

| अ.क्र | दिनांक | अनुसुचित दोन/तीन मधील नोटीसीचा प्रकार | कर निर्धारण पुस्तकातील क्र. | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे स्वरुप | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणा-याचे नाव किंवा अभिहस्तांकन करत्याचे नाव | खरेदीखताचे किंवा अभिहस्तांकन करत्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 13/12/2024 | CH02/403/16 | 2 | शिवकृपा अपार्ट रूम नं.108 कोपरी | निवासी | जितेंद्र रामचंद्र पवार | कल्पेश शांताराम साळवी |
| 2 | 13/12/2024 | CH05/165/21 | 5 | वैष्णवी अपार्टमेंट, बि.नं. 1, रूम नं. बी/202 परमात्मा पार्क, चंदनसार | निवासी | राकेश रघुनाथ ठोंबरे | सुभाष आर चव्हाण व सुमन सुभाष चव्हाण |
| 3 | 13/12/2024 | CH04/911/2 | 4 | देवकी निवासच्या मागे, कातकरी पाडा, चंदनसार रोड | निवासी | प्रशांत जयराम घाणेकर | प्रशांत जयराम घाणेकर व प्रिया प्रशांत घाणेकर |
| 4 | 13/12/2024 | CH04/1451/33 | 4 | भालचंद्र नगर फेज 3 आनंद नगर, एफ विंग रूम नं/403 अथर्व कन्स्ट्रकशन, चंदनसार | निवासी | सुबोध वामन चव्हाण व सिध्दांत सुबोध चव्हाण | अनुप अशोक रिंगे व कल्पना अशोक रिंगे |
| 5 | 13/12/2024 | CH07/699/104 | 7 | आई जिवदानी दर्शन चाळ नं. 62 रूम नं 04 सिध्दिविनायक मंदिर जवळ, गोवारी नगर, भाटपाडा | निवासी | सी. अरुमुग पेरुमल | जलील मांजरे खान |
| 6 | 13/12/2024 | CH04/1084/1 | 4 | कातकरी पाडी, चंदनसार | निवासी | ई. चेलापीरुमल यादव | सशी संतोष मिश्रा |
| 7 | 13/12/2024 | CH07/425/53 | 7 | न्यु साई दर्शन चाळ रूम नं. बी/02 आर टी ओ ऑफिस समोर, भाटपाडा | निवासी | विठ्ठल नागो पाटील | लालधर दिपचंद्र यादव |
| 8 | 13/12/2024 | CH07/425/54 | 7 | न्यु साई दर्शन चाळ रूम नं. बी/03 आर टी ओ ऑफिस समोर, भाटपाडा | निवासी | विठ्ठल नागो पाटील | राज गोपाल सावंत |
| 9 | 13/12/2024 | CH01/124/81 | 1 | राधिका अपार्टमेंट, रूम नं/412 गोसकोपरी | निवासी | सुरेश दिलीप कदम | संदेश रामचंद्र जाधव |
| 10 | 13/12/2024 | SH01/1032/2 | 1 | मारुती चाळ गाळा नं. 03 बालाजी नगर, कुंभारपाडा, शिरगाव | वाणिज्य | अलकेश सीताराम गुप्ता | राधिकादेवी रवि कुशवाह |
| 11 | 13/12/2024 | SH01/533 | 1 | राईपाडा | निवासी | अबुल अब्दुल खलीफ पटवरी | उमर फारुख अबुल खलील पटवारी |
| 12 | 13/12/2024 | CH03/23/31 | 3 | सदगुरु चाळ प्रभाकर चाळ, गासकोपरी | निवासी | अनंत सहदेव चोरंगे | निलेश जनार्दन जाधव |
| 13 | 13/12/2024 | CH07/699/132 | 7 | आई जिवदानी दर्शन चाळ नं.ए/12 रूम नं. 02 गोवारी नगर, भाटपाडा, चंदनसार रोड | निवासी | जितेंद्रसिंह लालाभाई चावडा | हंसराज अर्जन गडा |
| 14 | 13/12/2024 | SH01/1027/10 | 1 | मॉ जिवदानी चाळ गाळा नं. 12 कुंभारपाडा, कांदलपाडा, शिरगाव | निवासी | मोहम्मद इर्शाद सोहम्मद यामिन शेख | संगीता सभाजीत यादव |
| 15 | 13/12/2024 | CH07/631/15 | 7 | साई छाया चाळ रूम नं. 03 बरफपाडा, भाटपाडा | निवासी | सुमन राजेश सिंह | सौदागार सूर्याबली विश्वकर्मा |
| 16 | 17/12/2024 | CH04/127/4 | 4 | कातकरी पाडा, चंदनसार | निवासी | मंगेश दत्ताराम राणे | तेजश्री नितीन लव्हटे |
| 17 | 19/12/2024 | CH01/138/7 | 1 | सदगुरु चाळ गास कोपरी | निवासी | कृष्णा रघुनाथ भागडे | पंकेश प्रकाश जोगले |
| 18 | 19/12/2024 | CH04/1428 | 4 | जिवदानी चरण चाळ रुम नं/01 साई हिल नगरच्या मागे कोपरी नाका, | निवासी | संदीप सिताराम चव्हाण | गौतम गणपत धुरी |
| 19 | 19/12/2024 | CH02/430/49 | 2 | श्री नित्यानंद गुरुकृपा रुम नं. सी/409 कोपरी | निवासी | शैलेन्द्र रामआसरे सिंह | जयेश बाबुभाई कावा |
| 20 | 19/12/2024 | CH04/1452/11 | 4 | जय जिवदानी माता चाळ, कातकरी पाडा, चंदनसार | निवासी | प्रविण गणपत शेवडे | वैभव वसंत जाधव |

**(व्हिक्टर डिसोजा)**
**सहा. आयुक्त**
**प्रभाग समिती 'सी' चंदनसार**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक इ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय इ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक इ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com